# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२–२२१६ ३९७६
ई–मेल: mercindia@mercindia.org.in वेबसाईट: www. mercindia.org.in


## जाहीर नोटीस

**प्रकरण क्र.२०१०/६१** **जाहिरात क्र.१/२०११–१२**

## विद्युत अधिनियम, २००३ (विअ, २००३)च्या कलम (१५)च्या उपकलम (५)च्या खंड (ए) खाली नोटीस

१. मेसर्स नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टीम्स प्रा. लि. (केआयएसपीएल), ४१–४२ ए विंग, मित्तल कोर्ट, नरिमन पॉईंट, मुंबई – ४०००२१, यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात, राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना देण्यासाठी अर्ज केला आहे.

२. केआयएसपीएल यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (आयोग) केलेल्या अर्जाची प्रत, त्यासोबतच्या जोडपत्र व परिशिष्टांसह, कोणत्याही व्यक्तीस "www.knowledgeispower.in'' या आणि आयोगाच्या www.mercindia.org.in वेबसाईटवर किंवा विहित कार्यपद्धतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

३. उपलब्ध असलेल्या माहितीचा विचार केल्यानंतर, आयोगाचे सकृत्‌दर्शनी समाधान झाले आहे की, प्रति वर्षी १००० दशलक्ष युनिट्सपेक्षा जास्त विजेचा राज्यांतर्गत व्यापार पुढील पाच वर्षे करण्याकरिता परवाना देण्यासाठी अर्जदार अर्हताप्राप्त आहे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम २००४ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम २००६ ने सुधारित केलेल्या तरतुदींनुसार ए वर्गवारीतील विजेचा व्यापारी म्हणून अर्जदारास संपूर्ण महाराष्ट्र राज्यात राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना देण्याचे आयोग प्रस्तावित करीत आहे.

४. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात, राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना देण्याच्या प्रस्तावाच्या संदर्भात, सूचना किंवा हरकती असल्यास, वरील पत्त्यावर **दि. ८ जुलै, २०११ पर्यंत** खाली सही करणाऱ्यास मिळतील अशा रितीने पाठविण्यासाठी, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम (१५)च्या उप–कलम (५)च्या खंड (ए) खाली, याद्वारे नोटीस देण्यात येत आहे. या तारखेनंतर आलेल्या सूचना व हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. याबाबत, आयोगाने **दिनांक १२ जुलै, २०११ रोजी दुपारी १२.३० वाजता, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४००००५,** येथे आयोगाच्या कार्यालयात जाहीर सुनावणी आयोजित केली आहे आणि जी व्यक्ती सूचना किंवा हरकती पाठवेल ती व्यक्ती, इच्छा असल्यास, जाहीर सुनावणीस उपस्थित राहू शकेल; मात्र त्यासाठी कोणताही प्रवास भत्ता/दैनिक भत्ता आयोगाकडून दिला जाणार नाही.

सही/–
**(के. एन. खवारे)**
सचिव, मविनिआ

दिनांक : १२.०६.२०११
मुंबई